



दैनिक **रायगड नगरी**

अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित



दैनिक रायगड नगरी

या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.

Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706

Web : www.raigadnagari.com /
Email : raigad.nagari@gmail.com



● वर्ष १७ वे ● अंक १८५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.५ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


# ७ ऑक्टोबरला ठरणार धनुष्यबाण चिन्हाच भवितव्य

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**शिवसेना कोणाची यावरुन उच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. मागील सुनावणीवेळी न्यायालयाने धनुष्यबाण चिन्हाचा निर्णय निवडणूक घेणार असल्याचे निर्देश दिले आहेत. आता या संदर्भात मोठी बातमी आली आहे. धनुष्यबाण चिन्हाबाबत ७ ऑक्टोबरला निवडणूक आयोग निर्णय घेणार असल्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाने दोन्ही बाजूंना ७ ऑक्टोबरपर्यंत आपली बाजू मांडण्यास सांगितले आहे. त्यामुळे आता ७ तारीख दोन्ही गटासाठी महत्वाची असणार आहे.**




दरम्यान, अंधेरी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या निवडणुकीच्या अगोदर आयोग या संदर्भात निर्णय घेणार असल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेचे ज्येष्ठनेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंड केल्यामुळे राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळले. यानंतर शिंदे भाजपसोबत जात शिंदे-फडणवीस सरकार स्थापन केले. दरम्यान, शिंदेगटाने शिवसेना पक्षावर दावा सांगितला आहे. या प्रकरणी उच्च न्यायालयात सुनवाणी सुरू आहे. आता शिवसेना पक्षाचे चिन्ह धनुष्यबाण कोणाचे यावर निवडणूक आयोग निर्णय देणार आहे. त्यामुळे ७ ऑक्टोबर हा दिवस महत्वाचा असणार आहे.

## राज ठाकरेंनी घेतले बल्लाळेश्वर व कोंडजाई देवीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

**मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दि.४ ऑक्टोंबर रोजी अष्टविनायक पैकी असलेले बल्लाळेश्वर तसेच कुळदेवी असलेली कोंडजाई देवीचे दर्शन घेतले. पाली येथे बल्लाळेश्वर नगरीमध्ये सकाळी अकरा वाजता राज ठाकरे यांचे आगमन झाले असता ढोल ताशांच्या आणि फटाक्यांच्या आताषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले.**

मनसे कार्यकर्तेच्या उपस्थितीत मोठ्या उस्फूर्तात राज ठाकरे यांचे जंगी स्वागत करण्यात आले. दरम्यान, राज ठाकरे यांनी बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन ठाकरे यांची कुलदेवी असलेले सुधागड तालुक्यातील नाकशेत येथे असलेली कोंडजाई देवीचे दर्शन घेतले. आणि त्यांच्या हस्ते देवीची आरती करण्यात आली.



यावेळी मनसे नेते बाळा नादंगावकर, गोवर्धन पोलसानी, महाराष्ट्र नवनिर्माण वाहतूक सेनेचे प्रदेश सरचिटणीस महेश पोरे,मनसे रायगड जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील, सुधागड तालुका अध्यक्ष सुनील साठे, मनसे रायगड जिल्हा सचिव महिला आघाडी लताताई कळंबे, सुधागड तालुका उपाध्यक्ष संदिप मालुसरे, पेण-सुधागड सरचिटणीस वाहतूक सेना रवींद्र कदम, महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे तालुकाध्यक्ष भावेश बेलोसे, यांच्यासह मनसे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संजय राऊतांच्या न्यायालयीन कोठडीत १० ऑक्टोबरपर्यंत वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पत्राचाळ जमीन घोटाळा प्रकरणी अटकेत असलेले खासदार संजय राऊत यांच्या न्यायालयीन कोठडीत १० ऑक्टोबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यांच्या जामीन अर्जावर १० ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे. सक्तवसुली संचलनालयाने संजय राऊत यांना पीएमएलए कायद्याअंतर्गत अटक केली. आताच्या घडीला संजय राऊत आर्थर रोड तुरुंगात असून, हा मुक्काम वाढला आहे.

संजय राऊत सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. संजय राऊत यांनी जामीन मिळण्यासाठी



अर्ज केला असून, यावरील सुनावणी विशेष पीएमएलए न्यायालयात सुरू आहे. पत्राचाळ आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी संजय राऊतच मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप ईडीने केला आहे.

## सिडकोच्या महागृहनिर्माण योजना ऑगस्ट-२०२२ करीता अर्ज नोंदणीस पर्यंत मुदतवाढ

### वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेच्या अर्ज नोंदणीसही मुदतवाढ

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नागरिकांच्या उस्फूर्त प्रतिसाद आणि मागणीमुळे सिडको महामंडळाच्या ४,१५८ घरांच्या ऑगस्ट-२०२२ महागृहनिर्माण योजनेकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी करण्यासाठी, ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला असून या अनुषंगाने अनामत रक्कम व शुल्क भरणा, संगणकीय सोडत या प्रक्रियांनाही मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर योजनेकरिता अर्ज करण्यास ०३ ऑक्टोबर २०२२ ही अंतिम तारीख होती. परंतु, अधिकाधिक नागरिकांना योजनेचा लाभ घेता यावा, याकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणीस ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. तसेच सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील वाणिज्यिक गाळ्यांच्या आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेकरिता ऑनलाइन अर्ज करण्यासही ०९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या योजनेकरिता अर्ज नोंदणी करण्यास ०६ ऑक्टोबर २०२२ ही अंतिम तारीख होती.




सिडको महामंडळातर्फे ३१ ऑगस्ट २०२२ रोजी ऑगस्ट-२०२२ महागृहनिर्माण योजनेंतर्गत नवी मुंबईतील द्रोणागिरी, कळंबोली, तळोजा आणि खारघर नोडमधील सिडकोच्या गृहसंकुलांतील ४,१५८ घरे विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आली होती. परवडणाऱ्या दरातील या ४,१५८ घरांपैकी ४०४ घरे ही प्रधानमंत्री आवास योजनेंतर्ग आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि उर्वरित ३,७५४ घरे ही सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत. तसेच अन्य योजनेंतर्गत सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील २४५ वाणिज्यिक गाळे आणि नवी मुंबईतील रेल्वे स्थानक संकुलांतील ६ वाणिज्यिक जागा विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे महागृहनिर्माण योजना ऑगस्ट-२०२२ करीता ऑनलाइन अर्ज नोंदणी ०३ नोव्हेंबर २०२२ पर्यंत करता येणार आहे. ऑनलाइन अर्ज ०४ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सादर करता येणार आहेत. ऑनलाइन शुल्क भरणा ०७ नोव्हेंबर २०२२ पर्यंत करता येणार आहे. स्वीकृत अर्जदारांची प्रारुप यादी १४ नोव्हेंबर २०२२ रोजी तर स्वीकृत अर्जदारांची अंतिम यादी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी सिडकोच्या https://lottery.cidcoindia.com/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. योजनेची संगणकीय सोडत २२ नोव्हेंबर २०२२ रोजी पार पडणार आहे.

सुधारित वेळापत्रकाप्रमाणे सिडको गृहनिर्माण संकुलांतील वाणिज्यिक गाळे आणि रेल्वे स्थानक संकुलांतील वाणिज्यिक जागांच्या विक्री योजनेकरिता ऑनलाइन अर्ज, अनामत रक्कम व प्रक्रिया शुल्क भरणा ०९ नोव्हेंबर २०२२ पर्यंत करता येणार आहे. बंद निविदा ०८ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सादर करता येणार आहेत.

ई-लिलाव ०९ नोव्हेंबर रोजी पार पडून ११ नोव्हेंबर २०२२ रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे.


## पाली डम्पिंग ग्राऊंड समस्यांच्या गर्तेत

### कचरा रस्त्यावर, नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली शहरातील कित्येक टन कचरा येथील टेंबी वसाहती जवळील डम्पिंग ग्राऊंड मध्ये टाकला जातो. मात्र संरक्षक भिंत नसल्याने हा कचरा मुख्य रस्त्यावर येऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय इतरही अनेक समस्यांनी डम्पिंग ग्राऊंडला घेरले आहे.

डम्पिंग ग्राऊंडच्या आजूबाजूला शिक्षक व इतर वसाहती आहेत. आयटीआय व विद्युत महावितरण सबस्टेशन आहे. शिवाय गृहसंकुल इमारती सुद्धा आहेत. मढाळी व शिळोशी गावांना जाण्याचा हा मुख्य रस्ता आहे. त्यामुळे रस्त्यालगत असलेल्या डंपिंग ग्राऊंडवरील कचरा पूर्णपणे रस्त्यावर आल्याने व डंपिंग ग्राऊंडला संरक्षण भिंत नसल्याने घाण व दुर्गंधीमुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शिवाय तेथून जाणाऱ्या नागरिकांना नाकदाबून येजा करावी लागत आहे. फेब्रुवारी महिन्यात पाली ग्रामपंचायतीची नगरपंचायत झाली, मात्र अजूनही घनकचरा व्यवस्थापनचा प्रश्न अद्याप काही सुटला नाही. डंपिंग ग्राऊंडवर असलेल्या कचऱ्यामध्ये अधिक प्रमाणात प्लॅस्टिकयुक्त कचरा असतो. डंपिंग ग्राऊंडला संरक्षण भिंत नसल्याने मोकाट गुरे, कुत्रे तेथे येऊन प्लास्टिक मधील अन्नपदार्थ कचऱ्यासह



खातात त्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येत असून अनेक जनावरे देखील दगावली आहेत. याबरोबरच येथील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीच शास्त्रीय पद्धत नाही. हा कचरा थेट जाळला जातो. त्यामुळे मोठया प्रमाणात वायु प्रदूषण होऊन पर्यावरण व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

प्लास्टिक बंदीचा कायदा करूनही प्लास्टिकचा भस्मासुर दिवसागणिक वाढत चालला आहे. त्यामुळे या प्लास्टिकचा पुनर्वापर व प्रक्रिया व्हावी यासाठी सुधागड तालुक्यातील सिद्धेश्वर ग्रामपंचायतने पुढाकार घेतला आहे . यासाठी मुंबई ही संस्था, रायगड जिल्हा परिषद, सुकन्या संघ, शाळा, स्वदेस समिती व प्राईड इंडिया यांच्या सहाय्याने जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प राबवत आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतीचा आदर्श प्रत्येक ग्रामपंचायत व पाली नगरपंचायतीने घेऊन शहरातील प्लास्टिक एकत्रितपणे जमवून त्या प्लास्टिकचे पुनर्वापर (रिसायकल) करणे गरजेचे आहे. यामुळे पर्यावरणाचे संरक्षण आणि घनकचरा व्यवस्थापन उत्तम प्रकारे करता येईल. असे तज्ञांचे म्हणणे आहे.

## रेशनकार्डधारकांसाठी राज्य सरकारकडून दिवाळी पॅकेज जाहीर

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रेशनकार्ड धारकांसाठी राज्य सरकारकडून दिवाळीचे पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. केवळ १०० रुपयांमध्ये १ किलो रवा, चणाडाळ, साखर, तेल मिळणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे गरिबांची दिवाळी आता गोड होणार आहे.

आज झालेल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या संचामध्ये प्रत्येक शिधापत्रिकाधारकांना प्रती १ किलोच्या परिमाणात रवा, चणाडाळ, साखर व १ लिटर पामतेल याचा समावेश असेल. राज्यातील १ कोटी ७० लाख कुटुंबांना म्हणजेच सुमारे ७ कोटी लोकांना याचा प्रत्यक्ष लाभ होणार आहे. हा संच एक महिन्याच्या कालावधीकरिता देण्यात येऊन त्याचे वितरण ई-पॉस प्रणालीद्वारे करण्यात येईल. यासाठी येणाऱ्या एकूण ४८६ कोटी ९४ लाख खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

## अनिल देशमुखांना न्यायालयाकडून जामीन मंजूर

**दै.रायगड नगरी । मुंबई**



राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना थोडा दिलासा मिळाला असून त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. ईडीच्या गुन्ह्यातून त्यांना जामीन दिला आहे. परंतु सीबीआयनं दाखल केलेल्या गुन्ह्यात मात्र त्यांना जामीन मिळालेला नाही. त्यामुळे त्यांना आताही तुरूंगात राहावं लागणार आहे.

नुकतेच सर्वोच्च न्यायालयानंअनिल देशमुख यांच्या जामीन अर्जावर आठवड्याभरात सुनावणी घेण्याचे निर्देश उच्च न्यायालयाला दिले होते. सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंनी आपल्या बाजू न्यायालयासमोर मांडल्या. अनिल देशमुख यांचं वय ७२ वर्षे आहे आणि त्यांची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, त्यामुळे त्यांना जामीन मंजूर करण्यात यावा असं अनिल देशमुख यांचे वकील विक्रम चौधरी आणि अनिकेत निकम यांनी न्यायालयामोर सांगितलं. दरम्यान, त्यांना आता १ लाख रूपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला आहे. अनिल देशमुख यांच्या प्रकरणात कुठेही ते पहिल्या क्रमांकाचे व्यक्ती आहेत असं दिसून येत नाही. जे कोणी विटनेस आहेत आपले जबाब बदलले आहेत. यावरून देशमुख यांच्या सांगण्यावरून हप्तावसूली केली आहे हे दिसून येत नाही. त्यांच्या वयाबाबतही आम्ही युक्तीवाद केला आहे. त्यानंतर न्यायालयानं आमची विनंती मान्य करत त्यांना जामीन मंजूर केल्याची माहिती त्यांच्या वकिलांनी दिली.

## ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था आणखी बळकट करणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज 'आयुष्मान भारत हेल्थ कार्ड'चे वितरण करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.**



मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमाला आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, सचिव एन. नवीन सोना, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक तुकाराम मुंढे आदी मंचावर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्यातील प्रत्येक नागरिकाला उत्तम दर्जाची आरोग्यसेवा मिळावी यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यांतील शासकीय रुग्णालयांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात येणार आहे.

'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान अतिशय चांगल्या पद्धतीने राबविण्यात आले. या माध्यमातून महिलांची तपासणी करण्यात आली. हे अभियान ३१ ऑक्टोबरपर्यंत राबवले जाईल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, 'आयुष्मान भारत हेल्थ कार्ड' कार्यक्रम आरोग्य क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा उपक्रम आहे. आभा कार्डचा बहुविध उपयोग होणार आहे. आयुष्मान भारत हेल्थ कार्डमुळे आरोग्य क्षेत्राला तंत्रज्ञानाची जोड मिळणार आहे.

# राष्ट्रपिता गांधी व पूर्वपंतप्रधान शास्त्री यांच्या जयंतीदिनी नगराध्यक्षांनी स्वच्छता सेवकांचा केला सन्मान

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगरपंचायत नगराध्यक्षांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी व पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती निमीत्त रविवार दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता, या थोर विभूतींच्या प्रतिमां जवळ दिप प्रज्वलन करुन पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले.तसेच



नगरपंचायत महिला व पुरुष सफाई कर्मचारी हे स्वच्छता विभागाचे खऱ्या अर्थी राजदूत आहेत शासनाचे स्वच्छता अभियानातील हा महत्वाचा घटक त्यांचा नगरपंचायत कार्यालयात गुलाबपुष्प व नित्योपयोगी भेटवस्तु देऊन मोठ्या संख्येने उपस्थित नगरपंचायतचे महिला व पुरुष कर्मचारी, अधिकारी यांच्या साक्षीने यथोचित सन्मान केला आहे. तसेच अभियानाचा एक भाग म्हणुन सर्व माणगावकरांना लवकरच घरोघर कचरा बकेटचे (कुंडी) वाटप करण्यात येणार आहे.

पहिल्यांदाच अशा प्रकारे अत्यावश्यक सेवेतील सर्व कर्मचाऱ्यांचा सन्मान झाला असल्याने या सर्व कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी सफाई कर्मचारी यांची प्रामाणिक सेवा आणि स्वच्छ माणगांव सुंदर माणगांवची संकल्पना सत्यात उतरविण्यासाठी किती महत्वाची आहे, यावर संबोधन करीत कितीही अडचणी आल्या तरी स्वच्छते साठी आग्रही भुमिका मांडत, प्रसंगी कटुता स्विकारत माणगांव मध्ये परिवर्तन घडविणाराच! असा विश्वास व्यक्त केला. लोकांना काय हवयं, स्वच्छ पाणी आणि स्वच्छ शहर हे आपले महत्वाचे काम आहे, यासाठी आम्ही पाठपूरावा करत असतो.

परंतु दुर्दैवाने शासनाचे अधिकारी सहकार्य करीत नाहीत. अर्थात नुकतेच बदलुन गेलेले मुख्याधिकारी यांच्या भुमीकेवर त्यांनी तिखट शब्दात टिकास्त्र सोडले. त्यांचे कारभारावर नाराजी व्यक्त केली. त्यामुळेच स्वच्छते विषयक कामांना खिळ बसली होती, आता नवनियुक्त मुख्याधिकारी यांचे सहकार्याने या कामांना गती देऊ, व शहराचा कायापालट करुयात, यासाठी आपले सर्वांचे सहकार्य महत्वाचे आहे असे सांगितले. तसेच स्वच्छता सभापती अजित तार्लेकर यांनी देखील या स्वच्छतादूतांचे सहकार्या मुळेच मी नगरसेवक झालो असल्याचे म्हटले. तर उपनगराध्यक्ष यांनी माणगांव मध्ये स्वच्छतेविषयी चांगले परिवर्तन घडविणारच सांगत लालबहादूर शास्त्री यांची कर्तव्यनिष्ठता व त्याग ही गोष्ट सांगत आताच्या लोक प्रतिनीधींशी तुलना करत मार्मिक भाष्य केले.

यावेळी जेष्ठपत्रकार रायगड भूषण रविंद्र कुवेसकर यांनी ही इतरांकडुन स्वच्छतेची अपेक्षा करण्यापेक्षा स्वतःचे घरापासुनच स्वच्छता सुरु कशी करावी, यावर मनोगत व्यक्त केले. यावेळी विरोधी व सत्ताधारी पक्षाची एकही नगर सेविका तसेच अनेक नगरसेवकांची अनुपस्थिती मात्र स्पष्ट जाणवली. या स्तुत्य कार्यक्रमास नगरीचे लोकप्रिय नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, स्वच्छता आरोग्य सभापती अजित तार्लेकर, नगरसेवक निलेश रातवडकर, स्वि. नगरसेवक हेमंत (बंड्या) शेट तसेच युवा नगरसेवक कपिल गायकवाड व नगरपंचायचे अधिकारी जेई. आकाश बुवा सिटी को-ऑर्डिनेटर अतुल जाधव व सर्वच कर्मचारीवृंद उत्साहाने हजर होते. शेवटी आभारप्रदर्शन व महान विभुतींना नतमस्तक होऊन सर्वांना अल्पोपहार चहापानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# रोह्यात १४४ जणांची नेत्र तपासणी ; ५६ मोतीबिंदू रुग्णांना शास्त्रकियेसाठी पाठविले

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा येथिल नेत्र रुग्ण तपासणी शिबिरात सोमवारी १४४ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ५६ रुग्णांना आजच आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. गेल्या चार महिन्यांत रोहा सिटिझन फोरम ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल २८१ नेत्ररुग्णांना नवी दृष्टी मिळाली आहे.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. शासकीय विश्रामगृह दमखाडी, रोहा येथे झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, आणि मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू ऑपरेशन शिबिर पार पडले. हॉस्पिटलचे टीम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉक्टर संदेश रसाळ, नंदिनी देवधरकर, अश्विनी पाटील, राजदीप कौर, नरेश आवलर, ज्ञानोबा कांबळे आदींनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट चे अध्यक्ष नितीन परब, निमंत्रक प्रदिप देशमुख, सल्लागार दिलीप वडके, श्रीकांत ओक, अहमदशेठ दर्जी, उस्मानभाई रोहेकर, संतोष खटावकर, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, सचिन शेडगे, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, राजेश काफरे, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, भावेश अग्रवाल आदी फोरम च्या सर्व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतली. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे आभार मानले.



# फुंडे शैक्षणिक संकुलात कर्मवीर जयंती सभा संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

रयत शिक्षण संस्थेचे, तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे आणि वीर वाजेकर महाविद्यालय फुंडे यांच्या संयुक्त विद्यमाने नूकताच पद्मभूषण डॉ कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सभेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव, प्राचार्य डॉ. जे.जी.जाधव, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी जे पाटील साहेब,. सोलनकर सर, उरण पंचायत समिती सदस्य दिपक ठाकूर, विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ पी जी पवार, माध्यमिक विभागाच्या प्राचार्या सौ वर्तक मॅडम, उपमुख्याध्यापक श्री म्हेत्रे सर,पर्यवेक्षक श्री म्हात्रे सर,सर्व स्कुल कमिटी सदस्य ,कार्यालय प्रमुख श्री तुमडे सर आदी मान्यवरांच्या हस्ते कर्मवीर अण्णा आणि वीर वाजेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालयाचे विद्यार्थी नचिकेत म्हात्रे, मंदार म्हात्रे आणि विद्यार्थिनी यांनी सुमधुर आवाजात इशस्तवन, रयत गीत आणि स्वागतगीत सादर केले. दहावी बारावी परीक्षेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त आणि एन एम एम एस परीक्षेत शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी, चित्रकला परीक्षेत अ श्रेणी प्राप्त विद्यार्थी यांचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन कौतुक करण्यात आले. डॉ पवार सर आणि सौ वर्तक मॅडम यांनी प्रास्ताविकात विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख सादर केला. कु स्नेहल शिंदे हिने आपल्या भाषणातून कर्मवीर अण्णांची महती सांगितली. रायगड विभागीय चेअरमन, शिक्षक आमदार बाळाराम पाटील साहेबांनी व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे शिक्षक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. जे जी जाधव यांनी आपल्या भाषणातून शिक्षकांसोबत संवाद साधत विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन केले.शेवटी कृष्णा कडू यांनी विद्यालय व महाविद्यालयाच्या स्थापनेपासून चा इतिहास आपल्या भाषणातून विशद केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ दर्शना माळी, दिनेश सासवडे यांनी केले तर आभार . म्हात्रे एस डी यांनी मानले

# नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून तहसीलदार घारे यांनी केले ई -पीक पाणी चे प्रबोधन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

राज्यात सर्वत्र आधार कार्ड -मतदान कार्डाशी लिंक आणि ई -पीक पाणी अद्यावत करणे या बाबत उपक्रम सुरु आहे. म्हसळ्यातही तहसीलदार समीर घारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरु आहे. महसूल विभाग, तलाठी, मंडळ अधिकारी आणि त्यांचे सहकारी या कामात व्यस्त आहेत. तहसीलदार समीर घारे संपूर्ण तालुक्यात वातावरण निर्मिती करीत असून सध्या सर्वत्र नवरात्रोत्सवाचा धुमधडाका जोरात सुरु आहे.

नवरात्रौत्सव मंडळाना भेटी देऊन या बाबत तहसीलदार समीर घारे, नायब तहसीलदार धर्मराज पाटील, निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे, मंडळ अधिकारी नरेश उभारे, मंडळ अधिकारी सलीम शहा, सर्व तलाठी आणि त्यांचे सहकारी नवरात्रोत्सव मंडळ, सण उत्सव यांच्या माध्यमातून या उपक्रमाबाबत लोकांचे उत्तम प्रकारे उदबोधन करीत आहेत. म्हसळा कुंभार समाज सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळास तहसीलदार समीर घारे यांनी ई -पीक पाणी आणि आधारकार्ड मतदान कर्डाशी लिंक करणे याबाबत तेथील नागरिकांना याबाबत सविस्तर माहिती दिली. यामध्ये ई -पीक पाणी बाबत एक सरळ, सोपी आणि सर्वसाधारण नागरिकांना भरता येईल अशी माहिती असून मतदान कार्ड आधार कार्ड सोबत लिंक करण्याबाबतही सोप्या भाषेत माहिती असून सर्व मतदार बंधुनी ती भरावी असे आवाहन करताना यामुळे बोगस मतदान करणाऱ्यांना चांगला चाप बसेल असेही त्यांनी सांगितले. या वेळी नगरपंचायत मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, नगरसेविका राखी करंबे, भाई बोरकर,मंडळाचे अध्यक्ष सुनिल अंजर्लेकर, कुंभार समाज अध्यक्ष नंदू गोविलकर,योगेश करडे, प्रसाद पोतदार, प्रदिपशेठ कदम, नगरसेवक संजय दिवेकर,अनंत बिरवाडकर, विठोबा म्हशीलकर, हरिश्चन्द्र गोविलकर,मंगेश बोरकर, श्रीम. कुडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# रोह्यात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

जागतिक जेष्ट नागरिक दिन जगभरात साजरा केला जात असताना ,रोहा जेष्ट नागरिक सभागृहात जेष्ट नागरिक दिन मोठ्या उस्ताहात साजरा करण्यात आला.

यावेळी ८० वर्ष पार केलेल्या व अजूनही जगण्याची प्रबळ इच्छा शक्ती असलेल्या जेष्ट नागरिक विठ्ठलराव उर्फ व्ही टी देशमुख, सुधाकर अण्णा वालेकर, यशवंत देशमुख (शेनवई) अमिना रोहेवाला,भाई शीलधनकर, वनिता पाडसे, हिरामण नागोठकर, मधुकर हातकमकर सर, हरिचंद्र उशिरकर, बाळाराम खरिवले, रामभाऊ शिर्के, अनंत गुरव, रामचंद्र सुर्वे, अशा इतर २० जेष्ट नागरिकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी व्यासपिठावर मंडळाचे अध्यक्ष पां. बा. सरफळे (रावसाहेब) उपाध्यक्ष शांताराम गायकवाड.सचिव सुरेश मोरे. खजिनदार प्रकाश पाटिल. व्ही टी देशमुख. वकील सौ मनोहर. राऊत साहेब. मेहंदले सर, शरद गुडेकर, सुधाकर वालेकर. नंदकुमार भादेकर सर, सौ. शैलजा देसाई.आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी कयदेविषयक मार्गदर्शन करताना वकिल मनोहर मैडम यांनी सांगितले की २००७ साली जेष्ठ नागरीकांना आत्म सन्मान मिळावा याकरिता सरकारवर कायदा काढन्याची वेळ आली.त्यानुसार वृद्धांना आपला न्याय हक्क मागता येतो. सदर प्रांताधिकारी यांच्याकडे कोर्ट चालवला जातो.वृद्धांना मुले विचारीत नसतील तर पोटगी दिली जाते.तर जमीन विषयक बाबतीत जर वृद्धांची फसवणूक झाली असेल तर सदर जमिनीची कागद पत्रे रद्द केली जातात.व निराधार जेष्टा करिता शासनाच्या अनेक योजना आहेत त्याचा ही लाभ आपण घेतला पाहिजे. असे मार्गदर्शन मनोहर मैडम यांनी केले. यावेळी प्रास्थाविक अध्यक्ष पी.बी सरफळे. यांनी तर सूत्रसंचालन सुरेश मोरे व आभार शांताराम गायकवाड यानी मानले.व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खजिनदार प्रकाश पाटिल ,मंडळाचे सदस्य शरद गुडेकर,सुधाकर अण्णा वालेकर. मारुती राऊत, सौ शैलेजा देसाई, नंदकुमार भादेकर, चंद्रकांत गावडे,शेखर गुंड, हरीचंद्र माळी,नारायण पाटील, यानी अथक मेहनत घेतली. वनिता पाडसे, हिरामण नागोठकर, मधुकर हातकमकर सर, हरिचंद्र उशिरकर, बाळाराम खरिवले, रामभाऊ शिर्के, अनंत गुरव, रामचंद्र सुर्वे यांच्यासह अनेक जेष्ट नागरिकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.


## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे माझे पक्षकाराचे वतीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.गुरुनाथ पांडुरंग घरत रा.वरचे ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड हे खालील वर्णनाचा भूखंड १) श्री.दिपक चंद्रकांत म्हात्रे, २) श्री.आकाश चंद्रकांत म्हात्रे रा.ओवळे, पो.पारगांव, ता.पनवेल, जि.रायगड यांचे कडून (१०० टक्के) भूखंड त्रिपक्षीय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करून घेत आहेत. त्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणेः-

**भूखंडाचे वर्णन**
**नोड : पुष्पक/वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | संचिका क्र. | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| पुष्पक/वडघर | ओवळे-आसीओजीडी-२०७ | ०१ | १३० | ११० चौ.मी. |

सदर वरील भूखंडाच्या विक्रीचा करार तथा सदर भूखंडाचा भाडेपट्टा हक्क तबदील करण्याचा करार वर वर्णन केलेल्या भूखंड धारकांनी आमच्या पक्षकारासोबत केलेला आहे. तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी व अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार वकीलांच्या पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर भूखंड निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे विक्रीचे करार व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०४/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.कैलास नारायण घरत**
**००२, प्राईड सी.एच.एस. लि.,**
**सेक्टर-११, भूखंड क्र.०५, माथेरान रोड,**
**नवीन पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.९५९४६५३७७७**

**वकील : ए.के.साहू**

## जाहीर नोटीस

वाशी येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
ओ.एम.ए.क्र.३०७/२०२२
नि.नं.४
ने.ता.०३/११/२०२२

सै.रामेश्वरी विक्रम सिंग चौहान
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.१/३७, सुमतीनाथ अपार्टमेंट, हिराजी बाग,
को.ऑप.हौ.सोसायटी, जकेरिया बंदर रोड,
रुषभ टॉवरजवळ, शिवडी, मुंबई-४०००१५ अर्जदार
विरुद्ध
नवी मुंबई महानगरपालिका
आरोग्य खाते (जन्म मृत्यू विभाग)
बी-वार्ड, नेरुळ, नवी मुंबई, ता.व जि.ठाणे सामनेवाले

वरील अर्जदार यांची आई कै.श्रीमती.राजश्री रामजतन दुबे यांचा मृत्यू दि.२८/०६/२०२० रोजी घर नं.०४११, रुम नं.१०३, मातोश्री अपार्टमेंट, सेक्टर-२०, नेरुळ, नवी मुंबई येथे झालेला आहे. सदर मयताचे मृत्यूची नोंद त्यावेळी नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य खाते (जन्म-मृत्यू विभाग) बी-वार्ड, नेरुळ, नवी मुंबई, ता. व जि.ठाणे याच्या कार्यालयात झालेली नसल्याने अर्जदाराने मयताचे मृत्यू दाखला मिळणेकरिता सदरचा अर्ज मा.न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे, असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मृत्यूदाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने लेखी हरकत ही जाहीर नोटीस ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मृत्यू दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

दि.०४/१०/२०२२

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**सिव्हील कोर्ट, बेलापूर**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही १) श्री.बाळकृष्ण महादू राजे, २) सौ.सुगंधा एकनाथ पाटील, ३) सौ.राघुबाई केशव पाटील यांच्या मालकीची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील जमीन मिळकत आहे. तसेच सदरची जमीन ही आमचे अशिलांनी वर नमूद जमिनीचे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खलीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गांव | गट क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| तळोजे मजकूर | १२५/२/अ | ०-६९-३० | ३.१२ |

तरी वरील नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.०४/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा-पाचनंद, न्यू भारत**
**राईस मिल जवळ, ता.पनवेल,**
**जि.रायगड-४१०२०८**
**मो.नं.९२२२२२२७१६**

मे.मुजावर साहेब कोर्ट

**ॲड.तरबेज मास्टर**
**अर्जदारतर्फे वकील**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३९३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०९/११/२०२२

१) श्रीमती.बैसुननीसा अबुल हसन खान
वय : ५९ वर्षे, धंदा : घरकाम
२) आसिया अबुल हसन खान
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
३) मोहम्मद उमर अबुल हसन खान
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
तिघेही रा.फ्लॅट क्र.१०५, पहिला मजला,
रिझवी हाऊस, वीट सेंटर जवळ,
बंदर रोड पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्रं.१ यांचे पती व अर्जदार क्रं.२ ते ३ यांचे वडील कै. अबुल हसन रईस अहमद खान यांच्या नावे असलेल्या फ्लॅट मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट क्रं.१०५, पहिला मजला, रिझवी हाऊस, विट सेंटर जवळ, बंदर रोड, पनवेल, जि.रायगड, सी.टी. एस.नं.२२१/अ, २३१-अ/१, आणि २२१-अ/२/७, फ्लॅट क्षेत्र ५३६ चौ.फू (बिल्टअप)**

कै.अबुल हसन रईस अहमद खान हे दि.१४/०५/२०२० रोजी १०५, रिझवी हाऊस, विट सेंटर जवळ, बंदर रोड, पनवेल (मनपा), ता.पनवेल, जि.रायगड येथे निधन झाले असून त्यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हेच वारस असल्याचे प्रतिपादन करून तसा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास अशा हरकतदारने/नी/आपली/ल्या लेखी हरकत/ती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी स्वतः अगर प्रतिनिधीमार्फत सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याचे आत सदर मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास अर्जारांचे विनंतीनुसार त्यांस वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

आज दि.०४/१०/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## रोहयाचे माजी नगराध्यक्ष संजय कोनकर यांचे निधन

**दै.रायगड नगरी । रोहा**

भाजपाचे राज्य कार्यकारणीचे सदस्य, माजी जिल्हाध्यक्ष आणि रोहयाचे माजी नगराध्यक्ष संजय कोनकर यांचे सोमवारी पहाटे निधन झाले. ते ६१ वर्षाचे होते. संघर्षाच्या काळात रायगड जिल्ह्यमध्ये एन्ट्री देत त्यांनी भाजपाला रोहा नगराध्यक्षपदाचा पहिला बहुमान मिळविलेला, रोहा शहर, ग्रामीण भागात त्यांनी प्रचंड लोकप्रियता मिळविली, कोनकर यांच्या जाण्याने सामान्यांचा लोकनेता गेला असे म्हणत तालुक्यातुन त्यांना आदरांजली वाहण्यात आली आहे.



अभ्यासू राजकारणी कसा असावा, लोक संवादात रुबाब कसा असला पाहिजे, हे संजय कोनकर यांच्या नेतृत्वातून नेहमीच समोर आले. कोनकर यांनी आयुष्याच्या विविध टप्प्यांवर प्रचंड संघर्ष केला. मधल्या काळात अगदी राजकारणातील संन्याशी म्हणून संबंध जिल्ह्याने पाहिलेल्या या नेत्याला अखेर भाजपाने पुन्हा सन्मान दिला. त्यातूनच संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्षपद, युवा कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक म्हणूनही कोनकर यांनी यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. संजय कोनकर यांचा संपर्क दांडगा होता. स्व. गोपीनाथ मुंडे, स्व. प्रमोद महाजन आणि नितीन गडकरी यांचे ते विश्वासू सहकारी होते. राज्य, देशातील भाजपाचे अनेक नेत्यांशी कायम जवळीक पाहायला मिळाली.

भाजपा विचारधारेचे संजय कोनकर यांनी रायगड जिल्ह्यात भाजपाला प्रभावी उभारी दिली. १९९५ पर्यंत शहर, ग्रामीणात भाजपा अजिबात रुजला नव्हता. जिल्हा शेकाप व काँग्रेसचा बालेकिल्ला होता. याच काळात प्रचंड संघर्ष करत रोहा राजकारणाचे केंद्रबिंदू असलेल्या रोहा नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी संजय कोनकर १९९८ मध्ये जिल्ह्यात प्रथम विराजमान झाले. तब्बल ४ नगरसेवक भाजपाचे निवडून आले होते. भाजपासाठी जिल्ह्यात रोहा नगरपालिकेतील एन्ट्री क्रांतीची ठरली. पुढे बदलत्या राजकारणात मात्र कोनकर यांना प्रचंड संघर्ष करावा लागला. बदलत्या व्यवहारी राजकारणाचा फटका कोनकर यांना बसला. कोनकर हे भाजपाचे रायगड जिल्हाध्यक्षही राहिले. आयुष्यातील अनेक संघर्षांनी थकलेल्या संजय कोनकर यांनी अखेर सोमवारी पहाटे चिरनिद्रा घेतली. कोनकर यांच्या जाण्याने रोहा शहर, ग्रामीण भाग अक्षरश: स्तब्ध झाला. कोनकर यांना सोशल मीडियावर अनेकांनी शोक व्यक्त करत आठवणींना उजाला दिला. कोनकर यांच्या अंत्ययात्रेला सर्वपक्षीय राजकीय मंडळीसह सामाजिक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठया संख्येने उपस्थित होते, यावेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि रोहयाचे माजी नगराध्यक्ष समीर शेडगे यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गावात सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे : पोलीस उपायुक्त शिवराज पाटील

### कसळखंड ग्रामपंचायतीचा स्तुत्य उपक्रम; १५ सीसीटीव्ही कॅमेरांचे लोकार्पण

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गा-वात सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे आहे. सीसीटीव्हीमुळे गुन्हेगारीला आळा बसतो. त्याचबरोबर गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलीस प्रशासनाला मदत मिळते. त्यामुळे परिमंडळ २ हद्दीतील सर्व ग्रामपंचायतींना आवाहन करण्यात येते की गावाच्या परिसरातील जास्तीत जास्त ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत. जेणेकरून परिसरातील नागरिक सुरक्षित राहतील आणि गुन्हे उघडकीस आणण्याचे प्रमाण वाढेल, त्याचबरोबर गुन्ह्याला प्रतिबंध होईल. असे प्रतिपादन परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी केले. ते पनवेल तालुक्यातील कसळखंड येथे सीसीटीव्ही लोकार्पण कार्यक्रमादरम्यान मार्गदर्शन करताना बोलत होते.

पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी सर्व ग्रामपंचायतीचे सरपंच आणि उपसरपंच यांना आदेशित केले होते की तुमच्या गावाच्या हद्दीतील येणाऱ्या जाणाऱ्या मार्गावर, धार्मिक स्थळांवर किंवा महापुरुषांच्या पुतळ्याजवळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. जेणेकरून गावातील जनतेचे आणि त्यांच्या मालमत्तेचे तसेच महापुरुषांच्या पुतळ्याचे संरक्षण करणे सोपे होईल. या अनुषंगाने बहुतांश ग्रामपंचायतींनी याबाबत पूर्तता केली होती. सोमवारी (दि.३ ऑक्टोबर) संध्याकाळी पनवेल तालुक्यातील कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीच्या अंतर्गत कसळखंड, आष्टे, शिवाजीनगर, फणसवाडी आणि अरीवली अशी एकूण ५ गावे येतात. या पाचही गावात प्रत्येकी तीन कॅमेरे याप्रमाणे एकूण १५ सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

कसळखंड ग्रामपंचायीच्या सरपंच माधुरी पाटील व उपसरपंच मोनिका पाटील आणि सर्व सदस्यांनी स्वतःच्या निधीतून हे कामकाज यशस्वीरीत्या पूर्ण केले. या अनुषंगाने पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्या हस्ते व सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ, आजी-माजी पदाधिकारी आणि सर्व पक्षाचे नेते उपस्थित होते.

यावेळी सीसीटीव्ही कॅमेराचे फायदे आणि तोटे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी गावकऱ्यांना समजावून सांगितले. ज्या गावात सीसीटीव्ही असतात त्याठिकाणी गुन्हेगारीचे प्रमाण कमी असते. तसेच गुन्हा घडल्यास त्या दृष्टिकोनातून शोध घेणे पोलिसांना सोपे पडते.

या अनुषंगाने उर्वरित ग्रामपंचायतींनी देखील आपल्या गावाच्या हद्दीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घ्यावेत. तसेच महापालिका व सिडको हद्दीत देखील सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेण्यासाठी प्रशासनाकडे पाठपुरावा केला असल्याची माहिती पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

# मतिमंद निवासी शाळेला इनरव्हील क्लबच्यावतीने मदत

**दै.रायगड नगरी । कर्जत**

सह्याद्री आदिवासी निवासी प्रतिष्ठान संचलित मतिमंद मुलांची निवासी शाळेला इनरव्हील क्लब कर्जतच्यावतीने आर्थिक मदत करण्यात आली आहे.

कर्जत तालुक्यातील डिकसळ येथे सुमारे सतरा वर्षापासून कायम विनाअनुदानित तत्त्वावर मतिमंद मुलांसाठी कार्य करीत असलेले शाळेला इमारत बांधकामास इनरव्हील क्लबच्या कर्जतच्यावतीने ११,०००/- (अकरा हजार)रुपयाचा धनादेश संस्थेस सुपूर्त करण्यात आला.

याप्रसंगी क्लबच्या अध्यक्ष उत्तरा वैद्य, उपाध्यक्ष वनिता सोनी, तन्वी जोशी, पल्लवी सावंत, कीर्ती जोशी सुलोचना गायकवाड, संजीवनी घुमरे, उज्वला पाटील, दीपा खणाल आदी उपस्थित होत्या. यावेळी शाळेतील मुलांना तन्वी जोशी आणि किर्ती जोशी यांच्यामार्फत खाऊचे वाटप करण्यात आले.

Hon'ble Mujawar Court
Adv.Rajkumar V. Jadhav
Applicant Advocate

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION, AT PANVEL

CIVIL M.A.NO. 1051/2022
Exh No.14/D
Next Date : 14/11/2022

Mr.Jaiendra Ramkrishna @ Krishna Gurtu,
Aged 68 year, Occupation : None
Residing at : 307/B, New Garden View
Co-op Housing Society Limited,
Plot No.58, Prof.Almeida Road,
VTC : Bandra West S.O.
District Mumbai 400050 Applicant
V/s
None Respondent

All the public is informed by this notice inform that, Late Ramkrishna @ Krishna Shreekrishna Gurtu died at Mumbai on 13/02/1982 and Mr.Jaiendra Ramkrishna @ Krishna Shreekrishna Gurtu application for Heirship below Property of Late Ramkrishna @ Krishna Shreekrishna Gurtu


**Case No. Vahal 500 A, Surevey No.446, Hissa No.1, Area 0-31-0 H.R. Assessed at Rs.0.71., Village-Vahal, Tal-Panvel, Dist-Raigad, Value Rs.2,366/-**

The above mention property was owned Late Ramkrishna @ Krishna Shreekrishna Gurtu, Mr.Jaiendra Ramkrishna @ Krishna Gurtu are legal heirs of Late Ramkrishna @ Krishna Shreekrishna Gurtu. If any person has any objection to their rights in the above said property. He/She must appear with the quota within one month. If appropriate objection is not taken during this time. The court will take immediate action to obtain evidence for Mr.Jaiendra Ramkrishna @ Krishna Gurtu rights, and if they prove that they are entitled as legal Heirs of Late Ramkrishna @ Krishna Shreekrishna Gurtu the Heirship Certificate shall be issued in favour of Applicants. Date 04/10/2022 On the day I gave my sign and Court Stamp.

| Sd/- Jr.Clerk Hon Court S.D.Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superident. Hon Court S.D.Panvel |
|---|---|---|

# भक्तांच्या हाकेला धावून येणारी कोप्रोली कोळीवाड्यातील आई एकविरा

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील पूर्व विभागात कोप्रोली गावातील कोळीवाड्यात आई एकविरा देवीचे मंदिर असून भक्तांच्या हाकेला धावून येणारी माता, देवी म्हणून प्रसिद्ध आहे. सदर मंदिरांची स्थापना २५ मार्च १९९६ साली झाली असून नवरात्रात दररोज विविध सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक उपक्रम येथे राबविले जातात. लावणी, पैठणी, दांडिया, फॅन्सी ड्रेस अशा कार्यक्रमांचे आयोजन नवरात्रात करण्यात आले. आई एकविरा देवी मंदिर ट्रस्ट कोप्रोली कोळीवाडा व ग्रामस्थ एकत्र येऊन सण साजरे करतात. एकत्र येऊन विविध कार्यक्रमाला हातभार लावतात. आगरी कोळी तसेच सर्व समाजाच्या भाविक भक्तांच्या हाकेला पावणारी आई एकविरा देवीचा नवरात्रौत्सव कोप्रोलीमधील कोळीवाड्यात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.


# मुरुड समुद्रकिनारी कोळंबीचा जॅकपॉट नंतर उत्पादन निम्म्यावर

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड परिसरात समुद्रकिनारी गेले आठवडाभर मोठ्या प्रमाणात कोळंबी मिळत होती. हे उत्पादन इतके होते कि जणू जॅकपॉटच मच्छीमारांना लागला होता. परंतु दुसऱ्या दिवशी हे उत्पादन निम्म्यावर आल्याने मच्छिमारांच्या पदरी घोर निराश पडली आहे. अशी माहिती मच्छिमार रोहन निशानदार यांनी बोलताना दिली.

लागोपाठ तीन हंगाम फुकट गेलेल्या मुरूडच्या मच्छीमारांना कोळंबीचा जॅकपॉट लागला होता. गेल्या काही दिवसांपासून शेकडो किलो टायन, चैती कोळंबी सापडत असल्याने मासळी बाजारात कोळंबीचे अक्षरश: उधाण आले होते. मात्र आवक वाढल्याने दर कोसळले असून मच्छीमारांची आर्थिककोंडी झाली होती, असे असले तर खवय्यांची मात्र चांगलीच चंगळ झाली होती.

१ ऑगस्टपासून मच्छीमारीचा हंगाम सुरू झाला. परंतु निसर्गाच्या तडाख्यात सोनेरी हंगामासाठी गेलेल्या बोटी पुन्हा किनारी आल्या. त्यामुळे तीन हंगाम फुकट गेले. त्यानंतर आता गणपतीनंतर कोळंबीची आवक मोठ्या प्रमाणात वाढली होती. आता कुठे एक आशेचा किरण दिसू लागला होता. आणि हंगाम सुरू होण्यापूर्वी आनंदावर विरजण पडले. त्यामुळे पुन्हा मच्छिमार बांधवांच्या पदरी घोर निराशच पडली आहे.



# मटण व्यापाऱ्याची ४ लाख रोख रकमेची पिशवी लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मटण व्यापाऱ्याची ४ लाख रोख रकमेची पिशवी लंपास करून भरदिवसा दोन महिलांनी लुट्न पलायन केले. ही घटना खारघर वसाहतीमधील सेक्टर ३९ येथील परिसरात पापडीचा पाडानजीक बौद्ध स्मशानभूमीजवळील मार्गावर घटना घडली आहे.

मटण विक्रेते मेहमूद शेख यांचा व्यवसाय खारघरमध्ये आहे. अनेक मटण विक्रेत्यांकडून त्यांचे मटण विक्रीचे पैसे गोळा करण्याचे काम ते रिक्षातून फिरून करतात. पापडीचा पाडा येथील स्मशानभूमीजवळ शेख यांनी लघुशंकेसाठी रिक्षा उभी केल्यावर शेख यांच्याकडे ४ लाख ८ हजार रुपयांची रोख रक्कम होती. मात्र लघुशंकेसाठी आडोशाला उभे असताना त्यांच्याजवळ दोन महिला आल्या. त्यातील एक महिलेने बुरखा घातला होता. २५ ते ३० वयोगटांतील महिलांनी शेख यांनी येथे महिला उभ्या असताना तुम्ही लघुशंका का करताय, असा जाब विचारला.

शेख यांना बोलण्यात गुंतवून त्या महिलांच्या दुकलीने शेख यांची रोकड असलेली निळी पिशवी घेऊन त्यांच्या तिसऱ्या साथीदारासोबत दुचाकीवरुन पलायन केले. खारघर पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that on behalf that my Clients 1) Mr.Sunil Hiraman Ahire and Mrs. Vijaya Sunil Ahire purchased Flat No.301, Krishna Homes, Plot No.95, Sector-21, Kamothe, Navi Mumbai from Mr. Puneet Rajendra Thakkar as per the sale deed dated 14 th December 2013 having Reg. No.PVL-5-7014-2013. the said document had benn misplace / Lost while travelling in Kamothe on 26 th September 2022.

Any person having any claim through the aforesaid agreement and or having or claiming any right, title, interest or claim in respect of the said property or possession of the said property in any manner including by way of any Agreement, Undertaking, Agreement for Sale, Transfer, Exchange, Conveyance, Assignment, Charge, Mortage, Gift, Trust, Inheritance, Lease, Lien, Monthly Tenancy, Leave and License, Partnership, Joint Venture, Easement, right of prescription, any adverse right or claim of any nature whatsoever, disputed suit, decree, order, restrictive covenants, order of injunction, attachment, acquisition or otherwise upon and required to make the same known to the undersign in writing within 14 days from the date of publication hereof either by hand delivery against proper written acknowledgement of the undersigned or by the Registered Post AD failing which any such claim shall be deemed to be waived and / or abandoned.

Place : kamothe
Date : 04/10/2022 Sd/-

**Adv. Deepu Biju**
Shop No.2, Kohinoor Paradise CHS Ltd., Plot No.53, Sector-12, Kamothe, Navi Mumbai-410206

मुजावर साहेब

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.सना मुजावर**

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश, व.स्तर, पनवेल यांच्या न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८५०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/११/२०२२

१) मोहन नारसय्या पारलापेल्ली
२) भास्कर नारसय्या पारलापेल्ली अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, मयत कै.राजेश नारसय्या पारलापेल्ली यांचे डोहा, कतार येथे दि.१२/०८/२०२१ रोजी निधन झाले आहे. कै.राजेश नारसय्या पारलापेल्ली यांचे अर्जदार क्र.१ व २ हे मयत यांचे भाऊ आहे. अर्जदार हे भारतीय रहिवाशी, रा.विठ्ठल मंदिराजवळ, टी-४५, गव्हाण पाडा, बि.डी.मार्ग, चेंबुर, मुंबई-४०००७४ कायदेशीर वारस आहेत. यांनी या कोर्टात कै.राजेश नारसय्या पारलापेल्ली यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत मे.कोर्टाकडून वारस दाखला मिळावा म्हणून मे.कोर्टात केलेला आहे. कै.राजेश नारसय्या पारलापेल्ली यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**Flat No.A/201, Second Floor, Block No.04, JEWEL RESIDENCY (Phase-II) Village-Nere, TAL-PANVEL, DIST-RAIGAD**
**Valued at Rs.23,69,358/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

दि.३ ऑक्टोबर २०२२

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**जाहीर नोटीस**

सदर जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, संचिका GAN ICOGD-29 प्रमाणे मौजे : पुष्पक नोड येथे सेक्टर क्र.२४, भूखंड क्र.४५५, क्षेत्र ७०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा श्री.मनोहर गणा कोळी व श्री.सुरेश गणा कोळी रा.गणेश नगर, उलवे, ता.उरण, जि.रायगड यांच्या सहमालकीचा भूखंड आहे.

श्री.मनोहर गणा कोळी व श्री.सुरेश गणा कोळी यांस भूखंड विकसित करण्याचा अनुभव नसल्यामुळे त्यांनी मे.हाय टेक रिअल्टर्स तर्फे भागीदार १) श्री.प्रफुल मंजिभाई कपूपरा २) श्री.विनीत प्रफुल कपूपरा ३) सौ.उषाबेन प्रफुल कपूपरा पत्ता : ९०५ मयुरेश चेंबर, प्लॉट क्र.६०, सेक्टर ११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांस मौजे : पुष्पक नोड येथे सेक्टर क्र.२४, भूखंड क्र.४५५ क्षेत्र ७०० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड हा ५० टक्के / ५० टक्के या तत्वावर विकसनाकरिता देण्यात आलेला आहे. सदर भूखंडाबाबत सिडको कार्यालयात त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्यात येणार आहे. तरी कोणतीही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी कार्यालय यांचा सदर मिळकतीसंबंधी किंवा त्यावर किंवा त्याच्या भागावर, विक्री, गहाणवट, लिन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत/हरकतीबाबतची सुचना त्यात हक्क/हरकतीचे स्वरुप याची माहिती अन्य तपशिलासह की जी पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुराव्याने (वकील) मारिया कोळी खालील सही करणार यांसकडे त्यांच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की सदरहू मिळकत ही सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारच्या हक्काच्या बंधनापासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि श्री.मनोहर गणा कोळी व श्री.सुरेश गणा कोळी व मे.हाय टेक रिअल्टर्स तर्फे भागीदार १) श्री.प्रफुल मंजिभाई कपूपरा २) श्री.विनीत प्रफुल कपूपरा ३) सौ.उषाबेन प्रफुल कपूपरा हे सदर भूखंडाबाबत सिडकोसोबत त्रिपक्षीय कराराने आपल्या नावे करण्यात येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व सदर मिळकत ही बोजारहीत असेल असे मानण्यात येईल

दि.०४/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.मारिया कोळी**
**कार्यालयीन पत्ता : १ मजला, श्री प्रेरणा अर्पा., उरण, ता.उरण, जि.रायगड**
**संपर्क : ९७०२२०९११४**

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेल्या 'मालकांचे नाव' या सदरा पुढील नमूद केलेली जमीन मिळकत त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा, मालकी वहिवाटीत असून, त्यांची नावे सरकार दप्तरी कब्जेदार सदरी नोंदलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध, बोजारहीत आहेत, असा भरवसा सदरहू मालक / कब्जेदार यांनी दिला आहे व तशा संबंधीचे 'सदरहू मालकांचे' मालकी संबंधी निर्वेधतेसंबंधीचा दाखला 'टायटल सर्टीफिकेट' देण्याची विनंती आमचे अशिलांनी मला वकील नियुक्त करून केली आहे व त्याचाच भाग म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे प्रयोजन आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पाली बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| जमीन मालकांचे नाव | गट क्र. | उप विभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| रत्नप्रभा प्रभाकर श्रृंगारपुरे<br>मिरा अमोल कर्णिक<br>माधुरी उदय श्रृंगारपुरे<br>चिन्मय उदय श्रृंगारपुरे<br>संजिवनी सुरेंद्र प्रधान<br>सुनील नलिनचंद्र श्रृंगारपुरे<br>अनिल नलिनचंद्र श्रृंगारपुरे | ७८ | २ | १-२७-५०<br>पो.ख. ०-०७-८०<br>एकूण १-३५-३० | २.९१ |

तरी सदरहू मालक / कब्जेदार यांचे व्यतिरिक्त सदरहू मिळकती संदर्भात कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, लिन, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा कुळ वहिवाट, ताबाकब्जा, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त जप्ती, संपादन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा कसलाही व कोणताही हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याचे दिनांकापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार वकील यांजकडे लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती दाखल न केल्या गेल्यास व मागाहून येणाऱ्या हरकती ह्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन, सदरच्या मिळकती पूर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरुन तसा निर्वेधतेचा दाखला खाली सह्या करणार वकील देतील व आमचे अशिल सदरहू मिळकतींबाबत खरेदीच्या व्यवहाराबाबत पुढील कार्यवाही करतील याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.३/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.प्रदीप तु. भोईर**
**शॉप नं.९८, नगरपालिका कॉम्प्लेक्स, पहिला मजला, आद्य क्रांतीवर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**
**मो.नं.८१०८२८२७००**

# संक्षिप्त...

## मोटारसायकल चोर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटारसायकल चोरून ती पळवून नेणाऱ्या दोघं जणांना नागरिकांनी पकडून तळोजा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

तालुक्यातील पिसार्वेमधील रहिवासी स्वप्निल म्हात्रे यांनी त्यांची मोटारसायकल घराच्या कंपाउंड बाहेर उभी केली होती. सायंकाळी मोटारसायकल न दिसल्यामुळे स्वप्निल याने एका सहकाऱ्यासोबत पेट्रोल पंपाच्या दिशेने चोरट्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांना पनवेल-मुंब्रा हायवेजवळ दोन जण मोटारसायकल पळवून नेत असताना दिसले. यावेळी म्हात्रे यांनी चोरट्यांचा पाठलाग करुन त्या दोन्ही चोरांना पकडून तळोजा पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. तळोजा पोलीस स्टेशनमध्ये दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कर्जत तालुक्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्यावतीने तालुक्यातील अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी रा.जि. प. माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, कर्जत तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष भगवान चंचे, महिलाध्यक्षा रंजना धुळे, एकनाथ धुळे, रेखा दिसले, सुरेखा हरपुडे, युवक अध्यक्ष सागर शेळके, भूषण पेमारे, भास्कर दिसले, अरुण हरपुडे, स्वप्नील पालकर, राजन क्षीरसागर, शरद टवले, संतोष थोरवे, नारायण कारोटे, जय बोराडे, संतोष माळी, चंद्रकांत मिणमीणे, मंटू खडे, शहाराध्यक्षा पुष्पा दगडे, माथेरानच्या शहराध्यक्ष स्वातीकुमार, माजी नगराध्यक्षा रजनी गायकवाड, नगरसेविका सुवर्णा निलधे, भारती पालकर, सरपंच वंदना थोरवे, दीपाली पिंगळे, प्रभावती लोभी, वृषाली क्षीरसागर, पल्लवी कारोटे, नयना आखाडे, मनिषा पाटील, मीनल धुळे,वंदना शिंदे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.




**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# महेंद्र घरत यांच्या संघटनेच्या नामफलक अनावरणाची हॅट्रीक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामगार नेते महेंद्र घरत हे कामगार क्षेत्रात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करत असतांना स्थानिक पातळीवरही कामगारांवर आपल्या कामाची छाप पाडताना नेहमीच दिसत आहेत त्यामुळेच कामगारांचा ओढा त्यांच्याकडे वाढत आहे. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, इंटकचे राष्ट्रीय सचिव, खढऋया बहुराष्ट्रीय संघाचे उपाध्यक्ष अशी पदे भूषवित असल्यामुळे कामाचा व्याप वाढला आहे त्यामुळे नवीन कंपन्यांतील नामफलक अनावरणासाठी कामगारांना प्रतीक्षा करावी लागते याची जाणीव त्यांना आहे.



दिनांक ३ ऑक्टोबर २०२२ रोजी एकाच दिवशी संघटनेच्या तीन कंपन्यांमध्ये, मे. इकोग्लोब पॅकेजिंग पेण, चखऊउ सुरक्षा रक्षक रसायनी, मे. रुबी मिल खरसुंडी खालापूर येथे नामफलकाचे अनावरण संघटनेचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष, कामगारनेते महेंद्र घरत यांच्या शुभहस्ते तसेच पेण तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष अशोक मोकल, खालापूर तालुका अध्यक्ष कृष्णा पारींगे, माजी उपसभापती वसंत काठावले, संघटनेचे सरचिटणीस वैभव पाटील, रायगड जिल्हा युवा अध्यक्ष निखील डवळे, यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

बऱ्याच कंपन्यांतील कामगारांना किमान वेतन दिले जात नाही, हायर अॅन्ड फायर केले जाते; महिला कामगारांना हिण वागणूक दिली जाते. बोनस दिला जात नाही, तडकाफडकी कामावरून काढले जाते या सर्व समस्यांना कंटाळून या कंपन्यांतील कामगारांनी कामगार नेते महेंद्र घरत यांचे नेतृत्व स्विकारले आहे.

सर्व कामगारांना सन्मानाची वागणूक व न्याय मिळत नाही तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही त्यासाठी साम- दाम - दंड - भेद वापरून कामगारांना न्याय मिळवून देऊ असे यावेळी कामगार नेते महेंद्र घरत यांनी कामगारांना आश्वासित केले. याप्रसंगी पेण शहर काँग्रेसचे प्रवीण पाटील, सदानंद म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, अविनाश भोईर, मनोज विचारे, रोहित म्हात्रे, वैभव म्हात्रे, राजीव पाटील, विदु कुंभार, दत्तात्रेय शिंदे, संतोष ठोंबरे तसेच संघटनेचे संघटक - योगेश रसाळ, अरुण म्हात्रे, दिपक ठाकूर, आदित्य घरत, राजेंद्र भगत, विवेक म्हात्रे व शेकडोंच्या संख्येने कामगार उपस्थित होते.

# श्री शिर्डी साई बाबा यांच्या १०४ व्या महा समाधी दिन उत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री शिर्डी साई बाबा यांच्या १०४ व्या महा समाधी दिन उत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे प.पू. सद्गुरु श्री साई नारायण बाबा यांच्या आध्यात्मिक उपस्थितीत बुधवारी दिनांक ५ ऑक्टोबर २०२२ रोजी श्री साई नारायण बाबा आश्रम, पनवेल येथे आयोजन करण्यात आले आहे.



श्री शिर्डी साई बाबा यांच्या १०४ व्या महा समाधी दिन उत्सवानिमित्त बुधवारी दिनांक ५ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी १ ते रात्री ८.३० पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भूपाली, काकड आरती, पूजा, महाभिषेक तसेच बाबांच्या अर्चना व आरतीसह एकादश्याद्रव्य महानुद्राभिषेकाची आरती यांच्यासह १०८ वेळा दूध अभिषेक, श्री महा चरण पूजा, श्री साई पालखी आदी धार्मिक कार्यक्रम होणार आहे. तसेच श्री साई बाबांच्या अद्वितीय जीवन आणि शिकवणी या विषयावरील प्रवचनावरील चित्रफितीचे अनावरण, मध्य आरती नंतर महाप्रसादाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर संध्याकाळी ४.३० वाजता श्री साई महिमा, श्री गुरु महिमा आणि सांयकाळी ६ वाजता गोधूली आरती, सांयकाळी ६.३० वाट श्री साई भजन, संध्या ८.३० वाजता महा मंगल शेज आरती होणार असून त्यानंतर महाप्रसादचा कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व साईभक्तांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# वातावरणात दोन दिवसांपासून सकाळी धुकं

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यात गेले दोन दिवसांपासुन सकाळी वा-तावरणात धुक्याची चादर दिसु लागली आहे. दिवसभर ऊन सावलीचा खेळ सुरु आहे. या मोसमात परिसरातील माळरानांवर, गवत वेलींवर, विविधरंगी फुल उमलली, चतुर, फुलपाखरं भिरभिरताना सहज नजर टाकल्यास दिसून येत आहेत. नवरात्रौत्सवाची सांगता झाली असुन दसरा सणाच्या स्वागताला बाजारपेठा गोंड्याच्या पिवळ्या, केसरी फूलांनी सजल्या आहेत.

भाद्रपद महिना संपून आश्विन लागला, यंदा पाऊस डिसेंबर पर्यंत पडेल असे अंदाज व्यक्त होत आहेत. मात्र निसर्ग आपल्या लहरीत असुन पूर्वा,उत्तरा, हस्त नक्षत्रा आधी मघाचा पाऊस, पडलातर बरा नाहीतर आभाळा कडे टकमका बघां अशी गावाकडची म्हण आहे. यंदा मात्र अस न होता मघा नक्षत्रातही तो चांगलाच बरसला. आता हस्त नक्षत्रात थोडासा पण चांगलाच गडगडला आहे. अस म्हणतात पाऊस येताना नभ दाटुन मुसळधार सुरुवात करतो. साधारणतहा उत्तरा नक्षत्रात पाऊस उतरणीला लागतो मात्र यंदा जाताना हत्ती सारखे ढगांचा गजगडाट करतच जात आहे. यालाच तर हस्त नक्षत्र म्हणतात. आता हे गडगडणे म्हणजे पाऊस परतीच्या वाटेवर असल्याचे अंदाज व्यक्त होत आहेत.

अजुनही चित्रा व स्वाती नक्षत्र बाकी आहेत. दिवाळी सणात दिवे पाहायला येणारा स्वाती नक्षत्राचा पाऊस पाहुन अस म्हणतात समुद्रातील शिंपल्यातुन या पावसाचे थेंब पडताच मोती तयार होतात. चित्राचा पाऊस पडला तर सापांचे विष जहाल होत जाते असा समज गावाकडे असुन अजुनही जुनीजाणती माणस सांगतात. लहरी निसर्गाचा भरवसा देता येत नाही,असही अनेकांनी बोलुन दाखविले आहे. अजुनही हवेत म्हणावा तितका गारवां नसुन, कडक ऊन पडताच हवेत आद्रता व उष्मा वाढत आहे. आभाळातुन इतक पाणी बरसलं पण एक दोन दिवसाच्या ऊन सावलीच्या खेळात ओली जमिनही लगेच पूर्ववत सुकीठाक पडते. आता हिरवेगार गवताचे तांडे भातशेतं पिवळसर पोपटी रंग धारण करतात. खरतर दिवसाआड वेगाने होणारे बदल व आपले आरोग्याची काळजी घेण्याचा हा मोसम आहे. लवकरच ऑक्टोबर हिट (उष्मा) व पहाटे थंडी पडणार आहे. लोक म्हणतात यंदा चांगला पावसाळा अनुभवला. आता गुलाबी थंडीचीही सर्वांना प्रतिक्षा आहे.

# माथेरान मधील दहा युवकांचा भाजपमध्ये पक्षप्रवेश

**दै.रायगड नगरी । माथेरान**

देशात तसेच राज्यातील विविध ठिकाणी भाजप कडे युवा वर्गाचा कल वाढलेला दिसत असून माथेरान मधील काही होतकरू युवकांनी स्वेच्छेने भारतीय जनता पक्षाचे सदस्य स्वीकारले आहे.



नुकताच पनवेल येथील भाजप कार्यालयात आमदार तथा भाजप रायगड जिल्हाध्यक्ष प्रशांतदादा ठाकूर व कर्जत तालुका मंडळ अध्यक्ष मंगेशदादा म्हसकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षात प्रवेश केला यामध्ये योगेश जमदाडे, सौरभ घावरे, ओमकार रांजाणे, प्रतीक कासुरडे, शैलेश जमदाडे, मकरंद रांजाणे, राहुल चौधरी, मयूर चौधरी, कुंदन परदेशी, किरण चौधरी यांनी पक्ष प्रवेश केला आहे. त्यामुळे भाजपची ताकद दिवसेंदिवस माथेरान मध्ये वाढताना दिसत आहे. या सर्व नवोदित, होतकरू युवकांना उपस्थित सर्व मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माथेरान शहर उपाध्यक्ष किरण चौधरी सरचिटणीस राजेश चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, प्रदीप घा-वरे, चंद्रकांत जाधव, दीपक शहा, अरविंद शेलार, संदीप कदम, राकेश चौधरी, संतोष शेलार आदी मंडळी उपस्थित होते.

# आता उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्डची गरज नाही; शिवसेना शिंदे गटाच्या मागणीला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्ड बंधनकारक करण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश, रुग्णांसाठी वैद्यकीय योजना, तसेच कर्ज मंजुरीसाठी अडथळे निर्माण होत होते. मात्र, शिवसेना शिंदे गटाकडून याबाबतचे एक निवेदन तहसीलदारांना देण्यात आल्यानंतर हा अडथळा दूर झाल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

तहसीलदार कार्यालयाकडून वेगवेगळ्या प्रकारचे दाखले दिले जातात. त्यामध्ये उत्पन्नाचा दाखला अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याकरता तसेच शिष्यवृत्तीसाठी सुद्धा उत्पन्नाच्या दाखल्याची गरज आहे. पनवेल तह-सील कार्यालयाकडे यासाठी अनेक पालकांनी अर्ज केले आहेत. मात्र, नव्याने पदभार घेतलेल्या नायब तहसीलदारांकडे उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्ड बंधनकारक केले होते. त्यामुळे अनेकांची शिधापत्रिका ही मूळ गावी असल्याने तर काहीजण मुंबई येथून पनवेलला स्थलांतरित झाल्यामुळे मुंबईतच रेशन कार्ड असल्याने अडचणींचा सामना करावा लागत होता. अशातच प्रवेशाची मुदत संपत आली असतानासुद्धा संबंधित विद्यार्थ्यांना उत्पन्नाचा दाखला दिला जात नसल्याने याबाबत लाभार्थ्यां मध्ये नाराजीचा सूर उमटत होता. उत्पन्नाच्या दाखल्यासाठी रेशन कार्ड बंधनकारक केल्याने विविध अडचणी येत होत्या. यासंदर्भात माजी नगरसेवक शिवाजी थोरवे यांच्याकडे अनेक तक्रारी आल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे, शिवाजी थोरवे यांच्या शिष्टमंडळाने पनवेल तहसिलदारांना निवेदन सादर केले होते.

# सुपेगावमधून वन्यजीव सप्ताहास शुभारंभ ; फणसाड अभयारण्यचा उपक्रम

## जैव विविधता व छायाचित्र प्रदर्शन ठरले आकर्षण

**दै.रायगड नगरी । मुरुड**

फणसाड अभयारण्य वन्यजीव सप्ताह साजरा करण्यास सुपेगावमधून शुभारंभ करण्यात आला. हा उपक्रम फणसाड अभयारण्य प्रशासनाने आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण जैवविविधता व छायाचित्र प्रदर्शन ठरले आहे.

याचाच एक भाग म्हणून सुपेगाव पर्यटन संकुल येथे वन्यजीव सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. सदर कार्यक्रम मध्ये क्षेत्रीय वनकर्मचारी, महिला बचत गट सुपेगाव यांना वन्यजीव संरक्षणबाबत तसेच फणसाड जैवविविधता बाबत छायाचित्र प्रदर्शन करून मार्गदर्शन करण्यात आले हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले आहे. त्यानंतर ग्रीन वर्क ट्रस्ट यांनी नवीन गिधाड ई-कार्ड व फणसाड रेंज स्टाफ च्या हस्ते प्रसिद्ध केले. त्यानंतर सर्व वनकर्मचारी यांच्यासोबत विविध उपक्रम घेण्यात आले आहेत.

यावेळी गावातील शाळेतील मुले, महिला यांना वन्यप्राणी बाबत तसेच फणसाड अभयारण्य बाबत पीपीटी सादरीकरण तसेच छायाचित्रे प्रदर्शनद्वारे मार्गदर्शन करून वन्यप्राणी संवर्धनबाबत जनजागृती करण्यात आली. श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव येथील विद्यालयातील विद्यायांची चित्रकला स्पर्धा सुद्धा घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना जंगल सफर या विषयावर चित्रे काढण्याचा विषय देण्यात आला होता.

या शाळेतील कलाशिक्षक अमर दरणे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता पाचवी ते आठवी च्या गटात प्रथम क्रमांक शुभ्रा संतोष जमनु द्वितीय क्रमांक कस्तुरी जितेंद्र दिवेकर, तृतीय क्रमांक अन्वी निलेश बिरवाडकर याना मिळाला आहे. इयत्ता आठवीच्या गटात प्रथम क्रमांक सिद्धी विनायक शेडगे, द्वितीय क्रमांक भक्ती बाळासाहेब फत्तेपुरे, तृतीय क्रमांक ओम जनार्दन पाटील यांना मिळाला आहे.

सदरच्या कार्यक्रम प्रसंगी फणसाड अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी तुषार काळभोर, काशिद वनपाल एस. एल. शिंदे, सुपेगाव वनपाल एस. व्ही. तांडेल, नांदगाव वनपाल ए. पी. पाटील, ग्रीन वर्क ट्रस्टचे संस्थापक निखिल भोपळे व त्यांचे सर्व सहकारी, अंशू फाऊंडेशनचे निलेश गुड व त्यांचे सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# सेवानिवृत्त व मयत कामगारांच्या वारसांना जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या प्रयत्नामुळे सेवा उपदान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

विष्कर इन्फ्रास्ट्रक्चर (आय.ओ. टी. एल. धुतूम) च्या सेवानिवृत्त व मयत कामगारांच्या वारसांना जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या प्रयत्नामुळे सेवा उपदान (ग्रॅज्युटी)मिळवून दिल्याबद्दल कामगार प्रतिनिधींनी कामगार नेते जितेंद्र घरत यांचे आभार मानले.



उरण तालुक्यातील धुतूम येथे असलेल्या आय.ओ.टी.एल अंतर्गत विष्कर इन्फास्ट्रक्चर या ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कामगारांचा सेवा उपद-ानाचा ( ग्रॅज्युटी) प्रश्न प्रलंबित होता. वारंवार ठेकेदार बदलत असल्यामुळे कामगार सेवानिवृत्त झाला किंवा एखादा कामगार मयत झाल्यास त्या कामगारांना सेवा उपदान कोणी द्यायचा हा प्रश्न गेले कित्येक वर्ष प्रलंबित होता. मात्र जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर व अध्यक्ष जितेंद्र घरत यांनी प्रमुख मालक आय. ओ.टी.एल. चे व्यवस्थापन अधिकारी मिलिंद मोघे यांच्यासोबत चर्चा करून सदर सर्व कामगारांना त्यांचा सेवा उपदान मिळावा यासाठी आग्रह धरला, त्यानंतर प्रमुख मालक, व्यवस्थापनाने सदरची मागणी मान्य करून सेवा निवृत्त झालेले कामगार कृष्णा

आत्माराम पाटील, सदाशिव भरत ठाकूर, विकास धनंजय ठाकूर, हरिश्चंद्र राजाराम घरत, अर्जुन पोशा ठाकूर, बबन नानोसा संकपाळ यांना तर मयत कामगार प्रविण शंकर ठाकूर, श्याम यशवंत घरत यांच्या वारसदारांना सेवा उपदान देण्यात आले. यावेळी कामगार प्रतिनिधी शशिकांत ठाकूर, अर्जुन ठाकूर, ज्ञानेश्वर ठाकूर, चंद्रकांत कद्दू, बबन संकपाळ, तसेच संघटनेचे सचिव रविंद्र कोरडे उपस्थित होते.महत्वपूर्ण अशा या चर्चेमुळे कामगारांना न्याय मिळवून देण्यात यशस्वी झाले असून निवृत्त कामगार तसेच मृत कामगारांच्या वारसांनी आमदार प्रशांत ठाकूर, कामगार नेते जितेंद्र घरत यांचे आभार मानले.




महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कोकणभवन कार्यालय नवरात्र उत्सवात सहभागी झालेल्या महिला कर्मचारी दिसत असताना